महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.म.आ./ई/२४८०
दिनांक : २१/८/१८

## बैठकीचे इतिवृत्त

मा.महापालिका आयुक्त तथा अध्यक्ष शहर फेरीवाला समिती पुणे मनपा यांचे अध्यक्षतेखाली समिती सदस्यांची बैठक दि.१४/८/२०१८ रोजी दुपारी ४.०० वाजता मा. महापालिका आयुक्त कार्यालय येथे बैठक आयोजित करण्यात आली.

सदर बैठकीस खालील अधिकारी /सदस्य उपस्थितीत होते.

१) मा. अध्यक्ष शहर फेरीवाला समिती तथा महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका
२) मा. अति.महापालिका आयुक्त(वि) पुणे महानगरपालिका
३) मा. उप आयुक्त अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका
४) मा. पोलीस उप आयुक्त वाहतुक शाखा, पुणे शहर
५) सर्व मा. महा. सहा. आयुक्त, पुणे महानगरपालिका
६) सर्व अतिक्रमण निरीक्षक, अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका
७) मा. शहर फेरीवाला समिती – उपस्थित सदस्य

बैठकीचे आरंभी मा.उप आयुक्त (अतिक्रमण) यांनी मा.महापालिका आयुक्त तथा अध्यक्ष शहर फेरीवाला समिती श्री.सौरभ राव यांचे मा.सभासद श्री. रविंद्र माळवदकर साहेब यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

सर्वप्रथम दि. १६.०२.२०१८ रोजी झालेल्या बैठकीच्या वृत्तांतावर चर्चा होवून वृत्तांत कायम करण्यात आला.

सदर बैठकीमध्ये विषयपत्रांमधील विषयांवर सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र. | विषय | झालेली चर्चा | घेतलेला निर्णय |
| --- | --- | --- | --- |
| १ | पुणे शहरातील महामेट्रो प्रकल्पाच्या कामामध्ये अडथळा ठरणाऱ्या खालील ठिकाणच्या अनधिकृत नोंदणीकृत पथ विक्रेत्यांचे इतरत्र योग्य ठिकाणी पुनर्वसन करणेबाबत.<br>अ)स्वारगेट येथील व्यवसायिक<br>ब)सिव्हील कोर्टालगतचे व शिवाजीनगर धान्य गोडाऊन लगतचे व्यवसायिक<br>क)शिवाजीनगर | महा मेट्रो प्रकल्पाकरिता स्वारगेट पीएमपीएमएल बस स्थानकाजवळी पथ/स्टॉल विक्रेत्यांचे पुनर्वसन सिंहगड रोड येथील पर्वत्ती जलकेंद्र ते पु.ल.देशपांडे उद्यान येथील रस्त्याच्याकडेला करण्याचे ठरविण्यात आलेबाबत उप आयुक्त अतिक्रमण यांनी माहिती दिली. तथापि अशा प्रकारे सरसकट सर्व पथ विक्रेत्यांचे सिंहगड रोडवर पुनर्वसन करण्यास पथारी व्यवसायिक प्रतिनिधीनी विरोध दर्शविला त्याबाबत मा.उप आयुक्त अतिक्रमण यांनी काही व्यवसायिक त्यांच्या निवासी जागेच्या ठिकाणी जाण्यास तयार असल्यास त्यांचे त्या भागत उपलब्ध जागेनुसार पुनर्वसन करणे शक्य होईल असे सांगितले.<br>श्रीमती माधुरी राहिलकर यांनी अर्बन स्ट्रीट डिझाईन | स्वारगेट येथील पथ विक्रेत्यांचे पुनर्वसन सिंहगड रोड येथील पर्वत्ती जलकेंद्र ते पु.ल.देशपांडे उद्यान येथील रस्त्याच्याकडेला करण्याचे ठरविण्यात आले तसेच फेरीवाला संघटनांनी पथारी व्यवसायिकांनी त्यांच्या निवासी जागेजवळ जागा सुचविल्यास जागा निश्चित करण्यात येईल.<br>शिवाजी नगर एस.टी.स्टॅण्ड जवळील पथारीवाले दळवी हॉस्पिटल जवळ व हॉटेल प्राइड शेजारील मोकळया ॲनिमिटीस्पेस |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | एस.टी.स्टॅंड समोरील व्यवसायिक<br>ड)पौंड फाटा येथील उड्डाणपूला शेजारील व्यवसायिक<br>इ)डेक्कन कॉर्नर सावरकर स्मारकाजवळील व्यवसायिक | गाईड लाईनच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार मेट्रोचे व अन्य विकास कामे करण्यात यावी असे सुचविले.<br>श्री.शंके यांनी यापूर्वी बीआरटी प्रकल्प व उड्डाण पूलाच्या कामा निमित्त स्वारगेट येथील व्यवसायिकांना हटविणेत आले होते. त्यामुळे सद्यस्थितीतील पथारी व्यवसायिकांना मेट्रो चे काम पूर्ण झाल्यावर त्याच ठिकाणी पुर्नस्थापित करावे अशी मागणी केली.<br>मा.अध्यक्ष तथा महा.आयुक्त यांनी मेट्रोच्या प्रकल्पात याबाबत काही नियोजन केले आहे का याबाबत माहिती घेऊन कार्यवाही करणे शक्य आहे का याबाबत पडताळणी करण्यात येईल असे सांगितले.<br>श्री.जुगल राठी यांनी पथारी व्यवसायिकांचे पुनर्वसन करताना पदाचाऱ्यांची देखील सोय करणेबाबत सुचविले.<br>शिवाजी नगर एस.टी.स्टॅण्ड जवळील पथारीवाले दळवी हॉस्पिटल जवळ व हॉटेल प्राइड शेजारील गल्ली मध्ये शिफ्ट करावे.<br>पौड फाटा येथील पथारी व्यवसायिकांचे पोलीस स्टेशनच्या अलीकडील उपलब्ध जागेत पुनर्वसन करण्यात येत असल्याबाबत सांगण्यात आले.<br>डेक्कन कॉर्नर व सावरकर स्मारक येथील फेरीवाल्यांचे आहे त्याच ठिकाणी पुर्नवसन करण्यात येत असल्याबद्दल सांगण्यात आले. | जागेत शिफ्ट करण्यात येतील.<br>पौड फाटा येथील पथारीवाल्यांचे पोलीस स्टेशनच्या अलीकडील फूटपाथवर पुनर्वसन करण्यात येईल.<br>डेक्कन कॉर्नर व सावरकर स्मारक येथील काही फेरीवाल्यांचे आहे त्याच ठिकाणी पुर्नवसन करण्यात येणार असून सदर ठिकाणी फुटपाथची रुंदी मोठया प्रमाणात उपलब्ध असल्याने मध्यभागी जागा सोडून समोरासमोर पुनर्वसन करण्यात येणार आहे.<br>जर संबंधीत फेरीवाले त्यांचे राहण्याचे ठिकाणालगत स्थलांतरीत होत असल्यास प्रस्ताव दाखल करुन घेऊन मान्यता देणे. |
| २ | अधिकृत/नोंदणीकृत पथविक्रेत्यांनी अटी/शर्तीचा किरकोळ भंग केल्यास त्यांचे प्रमाणपत्र रद्द करण्याऐवजी प्रत्यक्ष रु.२०००/-पर्यंतचा दंड आकारुन समज देणेस.<br>(संदर्भ केंद्र शासन हॉकर्स धोरण-२०१४ चे मधील प्रकरण ९ कलम २८ अन्वये तसेच चे अन्वये) तसेच महाराष्ट्र शासन पथविक्रेता योजना २०१७ चे मधील प्रकरण ५ मधील ५.५ चे अन्वये ) | अटी व शर्तीचा भंग केल्यास पथारी व्यवसायिकास करावयाच्या शास्तीबाबत प्रस्तावातील दंडाची रक्कम रु. २०००/- न आकारता त्यामध्ये २ ते ३ टप्पे करण्याबाबत पथारी संघटनांच्या प्रतिनिधींनी मागणी केली. याबाबत उपआयुक्त अतिक्रमण यांनी कायदेशीर तरतूदीनुसार दंड आकारणे आवश्यक असल्याचे सांगितले. | अटी व शर्तीचा भंग केल्यास<br>१) प्रथम लेखी समज देणे.<br>२)त्यानंतर दंडाची रकंममेमध्ये सवलत अथवा टप्पे करणे मा.अध्यक्ष तथा फेरीवाला समिती अध्यक्षयांनी निर्णय घेण्याचे ठरविले. त्यानुसार रक्कम रु. 1000/- इतका दंड निश्चित करणेत आला आहे.<br>३)अंतिमत: तिसऱ्या वेळेस व्यवसायिकांनी अटी शर्तीचा भंग केल्यास त्यांचे प्रमाणपत्र रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल. |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या नवीन ११ गावांमधील रस्ता/पदपथांवरील पात्र फेरीवाल्यांचे मान्य धोरणा अंतर्गत बायोमेट्रिक सर्वेक्षण करणे. संगणकीय नोंदणी करणे व त्या हद्दीत नवीन हॉकर्स झोन निर्माणकरुन योग्यरीत्या त्यांचे पुनर्वसन करणे. | सदर ठिकाणी सर्वेक्षण करण्यात यावे अशी फेरीवाला समिती सदस्यांनी मागणी केली. | ११ गावांत फेरीवाल्यांचे सर्वेक्षण केले जाईल. |
| ४ | नोंदणीकृत पात्र फेरीवाल्यांचे पुनर्वसन केल्यानंतर प्रत्यक्ष जागेवर प्रमाणपत्रधारक स्वत:व्यवसाय न करता इतरांना भाड्याने व्यवसाय चालविण्यास दिला असल्यास अथवा जे नोंदणीकृत व्यवसायिक नेमून दिलेल्या जागेवर बऱ्याच कालावधीपासून व्यवसाय करताना आढळून येत नाहीत. अशा व्यवसायिकांचे अधिकृत परवाने /फेरीवाला प्रमाणपत्रे निलंबित करण्याची कार्यवाही करणे. (डाटबेस क्लीअर करणे) | पुणे शहरात पाहणी केली असता नोंदणीकृत पात्र फेरीवाले /अधिकृत परवाना असलेले व्यवसायिक अन्य व्यक्तिस इतरांना भाडयाने देतात अथवा जागेवर प्रत्यक्ष व्यवसाय करीत नाही. त्यामुळे प्रत्यक्ष गरजू व्यवसायिकांना यापासून वंचित राहतात व अशाप्रकारे परस्पर कायदयातील अटींचा भंग करीत आहेत त्यामुळे त्यांच्यावर कारवाई होणे आवश्यक असल्याचे उपआयुक्त अतिक्रमण यांनी सांगितले. | नोंदणीकृत व्यवसायिक/अधिकृत व्यवसायिक यांनी व्यवसायाच्या ठिकाणी स्वत:हा व्यवसाय करणे शक्य नसल्यास घरातील अन्य व्यक्तीची मदत घेऊ शकतो. तथापि भाडयाने दिल्यास अथवा अनेक काळ व्यवसाय करत नसल्यास त्यांचे प्रमाणपत्र रद्द करण्याची प्रक्रिया करण्यात यावी. |
| ५ | नगररोड (वडगावशेरी) क्षेत्रिय कार्यालयाकडील मा.प्रभाग समितीमध्ये मान्य झालेल्या ठरावानुसार तेथील हॉकर्सच्या पुनर्वसन जागेस मान्यता देणेबाबत तसेच यापूर्वी मान्य झालेल्या फेरीवाल्यांकरिताच्या दैनंदिन शुल्काच्या नवीन दरास मान्यता देणेबाबत. | मा.अध्यक्ष प्रभाग समिती नगररोड-वडगावशेरी कार्यालय ठराव क्र.११, दि.२०/०२/२०१८ त्यानुसार अंमलबजावणी होणेबाबत व्ही आय पी रस्ता येरवडा एअरपोर्ट रोड पीडब्ल्यूडी भिंतीलगत व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकांचे आयबीएम गल्ली जगताप चौक येथे त्यांचे श्रेणीनुसार पुनर्वसन करणे.<br>मा.अध्यक्ष प्रभाग समिती नगररोड-वडगांवशेरी कार्यालय ठराव क्र.१२ दि.१९/०३/२०१८ त्यानुसार अंमलबजावणी होणेबाबत. गुंजन टॉकीज ते एअरपोर्ट रोड सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने पथारी व्यवसायिक श्री.संतोष राजगुरु व मगनलाल प्रल्हाद | सदर विषय मान्य करण्यात आला आहे. |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | इंगवले यांना पर्यायी जागा जगताप चौक आय.बी.एम लगत किंवा मंत्री मार्केट मध्ये दयावी असे ठरावामध्ये मान्य करण्यात आले आहे त्यानुसार त्यांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण करुन जगताप चौक आय.बी.एम लगत जागा देणेबाबत. | |
| ६ | आयत्या वेळेचे विषय<br>१) पुर्नवसनानंतर इमारतीचे मेंन्टेन्स व इतर शुल्क वसुल करणेबाबत. | उप आयुक्त अतिक्रमण यांनी धानोरी, वडगावशेरी, सिंहगड रोड, सनसिटी येथे फेरीवाला व्यवसायिकांचे ओटा मार्केटमध्ये पुनर्वसन करण्यात येत असल्याबाबत माहिती दिली. तथापि त्यानंतर सदर इमारतींचे देखभाल दुरुस्ती व स्वच्छते संदर्भात राखणेकामी संबंधित व्यवसायिकांकडून काही मासिक शुल्क आकारणे आवश्यक असल्याचे सांगितले.<br>शहर फेरीवाला समिती सदस्य श्री सहस्त्रबुद्धे यांनी इमारतींमधील पार्किग मध्ये व्यवसायिक अतिक्रमण करुन वाहनां पार्किग करुन दिले जात नसल्याबद्दल माहिती दिली. त्यामुळे रस्त्यावरील वाहनांचे पार्किग वाढून पादचारी व रस्त्यावरील वाहतूकीची कोंडी होत असल्याचे सांगितले. सदरची अतिक्रमणे हटविण्याची मागणी केली. तसेच मा.नगर अभियंता हे समितीचे सदस्य असून उपस्थित राहण्याविषयी मागणी केली.<br>तसेच श्री.विनय पै यांनी शहर फेरीवाला समितीच्या बैठकीचा अजेंडा कमीत कमी आठ दिवस आगोदर पाठविल्यास विषयांवर चर्चेवेळी अभ्यास करणे शक्य होत असल्याचे सांगितले.<br>श्री.शंके यांनी शहरफेरीवाला समितीच्या बैठका नियमितपणे घेण्यात याव्या अशी मागणी केली.<br>फुड प्लाझा बाबत नियोजन करणेची मागणी करण्यात आली. | सदर बाबत योग्य ते शुल्क आकारण्यात यावे.<br>मा.महापालिका आयुक्त यांनी पुढील बैठकीत नगर अभियंता उपस्थित राहण्याबाबत व अनधिकृत बांधकांमावर कारवाई करण्याबाबत आदेश दिले.<br>उप आयुक्त मालमत्ता व्यवस्थापन या आधिकाऱ्यांनाही बोलाविण्यात यावे. असे सांगण्यात आले.<br>बैठकीचा अजेडा सात दिवस अगोदर पाठविण्यात येईल.<br>पुढील बैठक दि. १ ते १० नोव्हेंबर दरम्यान घेण्यात येईल असे ठरले.<br>फुडप्लाजा जागा निश्चित झाल्यावर, बैठकीला गॅस सिलेंडर कंपन्यांच्या आधिकाऱ्यांनाही बोलावण्यात येईल. |

वरील प्रमाणे चर्चा होऊन शहर फेरीवाला समितीची बैठक संपन्न झाली.

सौरभ राव
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रतः- सर्व संबंधित कार्यालयास योग्य त्या कार्यवाहीकरिता-

Scanned by CamScanner